महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.२८३/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ४५६ दिनांक २३ / ०४ / २०१३

विषय : सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ अनुसार 'शिपाई' आणि 'भांडार मदतनीस' या पदांकरिता विहित करण्यात आलेला उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ सुधारित करण्याबाबत.

वाचा : १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३२०, दिनांक २२.११.२०१०
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४८, दिनांक ०२.०३.२०१३

.....

सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ अन्वये कंपनीमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवा कालावधीत उच्च वेतन श्रेणीचे प्रथम व द्वितीय लाभ देण्याबाबतच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० अनुसार ज्या कर्मचाऱ्यांची तदर्थ म.रा.वि.मंडळ व मंडळाच्या विभाजनानंतर महावितरण कंपनीमध्ये अखंडित २८ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ मंजूर करण्याबाबतच्या सूचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत.

२. या अनुषंगाने प्रशासकीय परिपत्रक क्र. ३२०, दिनांक २२.११.२०१० अन्वये 'शिपाई' पदांवर आणि प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४८, दिनांक ०२.०३.२०१३ अन्वये 'भांडार मदतनीस' या पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ देण्याकरिता वेतनश्रेण्या विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर विहित करण्यात आलेल्या वेतनश्रेण्यांबाबत सखोल परिक्षण करुन कंपनीमध्ये लागू करण्यात आलेल्या सुधारित कर्मचारी मानंकानुसार तसेच कंपनीत विविध पदांकरिता लागू करण्यात आलेल्या संवर्गनिहाय वेतनश्रेण्या विचारात घेऊन व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचारविनिमय करुन 'शिपाई' आणि 'भांडार मदतनीस' या पदांकरिता तृतीय लाभ देण्यासाठी विहित करण्यात आलेल्या वेतनश्रेण्या खालीलप्रमाणे सुधारित करण्याकरिता मंजुरी प्रदान केली आहे.

| पदनाम | सा.आ.क्र.७४ (क) चा तृतीय लाभ द्यावयाची सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|
| **शिपाई / भांडार मदतनीस**<br>रु.८०४०-१५५-८८१५-१८५-१०६६५-२२०-१५७२५ | रु. ९५७०-३२५- ११९९५-३६०- १४७९५- ३९०-२७२७५ |

३. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की 'शिपाई' आणि 'भांडार मदतनीस' या पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीचा मंजूर करण्यात आलेला तृतीय लाभ हा उपरोक्त नमूद वेतनश्रेणीनुसार सुधारित करण्यात यावा व त्या अनुषंगाने वेतननिश्चिती करण्यात यावी.

४. सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ व प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४, दिनांक २८.०७.२०१० मधील इतर तरतूदी अबाधित राहतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**